आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

१९ मे २०२४ - रविवार

**ठळक बातम्या**

- लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यात देशभरातल्या ४९ जागांसाठी उद्या मतदान /राज्यातल्या १३ मतदारसंघांमध्ये मतदानासाठी प्रशासन सज्ज

- निवडणुकीच्या शेवटच्या दोन टप्प्यांसाठीचा प्रचार शिगेला /प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या आज झारखंड आणि पश्चिम बंगालमध्ये अनेक प्रचारसभा

- बंगालच्या उपसागराचा काही भाग, निकोबार बेटे आणि दक्षिण अंदमानच्या समुद्रात नैऋत्य मोसमी पावसाची आगेकूच

- काँग्रेसचे ज्येष्ठ नेते प्रतापराव भोसले यांचं निधन

**आणि**

- थायलंड खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत भारताच्या सात्विक साईराज रांकीरेड्डी आणि चिराग शेट्टी यांनी पटकावलं पुरुष दुहेरीचं विजेतेपद

**<><><><><>**

देशभरातली ६ राज्यं आणि दोन केंद्रशासित प्रदेशांमधे मिळून ४९ मतदारसंघात उद्या मतदान होईल. उत्तरप्रदेशात १४, महाराष्ट्रात १३, पश्चिम बंगालमधे ७ ओदिशा आणि बिहारमधे प्रत्येकी पाच, झारखंडमधे ३ तर जम्मू काश्मीर आणि लडाखमधे प्रत्येकी एका मतदारसंघात उद्या मतदार

आपला प्रतिनिधी निवडतील. सकाळी ७ ते संध्याकाळी ६ या वेळेत मतदान करता येईल. देशभरातल्या ९४ हजार ७३२ मतदान केंद्रांवर मिळून ९ लाख ४७ हजारपेक्षा जास्त कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत. या टप्प्यात ८ कोटी ९५ लाख पात्र मतदार ६९५ उमेदवारांचं भवितव्य मतदानयंत्रात बंद करतील. यात ४ कोटी ६९ लाख पुरुष मतदार असून ४ कोटी २६ लाख महिला मतदार आणि ५ हजार ४०९ तृतीयपंथी मतदार आहेत. मतदान शांततेत व्हावं या दृष्टीनं सुरक्षा व्यवस्था ठेवण्यात आली असून आंतरराष्ट्रीय हद्दीवरच्या २१६ चौक्या आणि आंतरराज्य सीमारेषांवरच्या ५६५ चौक्यांवर कडक बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यात राज्यात १३ मतदारसंघांमध्ये उद्या मतदान होणार आहे. मुंबईतले सर्व सहा मतदारसंघ, ठाणे, पालघर, भिवंडी, कल्याण, नाशिक, दिंडोरी आणि धुळे यांचा त्यात समावेश आहे. राज्यात हा मतदानाचा अखेरचा टप्पा आहे. मतदानाच्या दृष्टीनं प्रशासनानं जय्यत तयारी केली आहे. याआधीच्या टप्प्यांमध्ये मतदानाची कमी टक्केवारी पाहता मतदानाचं प्रमाण वाढवण्याचे प्रयत्न निवडणूक आयोग करत आहे.

राज्यात २४ हजार ५७९ केंद्रांवर मतदान होणार आहे. यासाठी ४१ हजार ८९७ बॅलट युनिट्स, २४ हजार ५७९ कंट्रोल युनिट्स आणि व्हीव्हीपॅटची व्यवस्था केली असून, तसंच मतदान केंद्रांवर वेबकास्टिंगची

व्यवस्थाही उपलब्ध आहे. मतदान केंद्रांवर पिण्याचं पाणी, वैद्यकीय मदत, शौचालयं, प्रतीक्षालयं यांची सोय करण्यात आली आहे.

मुंबईत दिव्यांग मतदारांसाठी सुमारे ६०० बेस्ट बसची मोफत सेवा उपलब्ध असेल. मतदानाच्या प्रक्रियेदरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी आवश्यक सुरक्षाव्यवस्था तैनात करण्यात आली आहे. राज्यात एकंदर २६४ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत. अरविंद सावंत, पियुष गोयल, अमोल किर्तीकर, उज्वल निकम, वर्षा गायकवाड, हेमंत गोडसे, श्रीकांत शिंदे आदी उमेदवार नशीब आजमावत आहेत.

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या शेवटच्या दोन टप्प्यांसाठीचा प्रचार शिगेला पोहोचला आहे. प्रधानमंत्री आणि भाजपाचे ज्येष्ठ नेते नरेंद्र मोदी यांनी आज झारखंड आणि पश्चिम बंगालमध्ये अनेक प्रचारसभांना संबोधित केलं. तृणमूल काँग्रेस पक्ष घुसखोरांचं स्वागत करतो, पण शेजारच्या देशांमधल्या छळाला कंटाळून भारतात आलेल्या अल्पसंख्यक हिंदूना मात्र कडवा विरोध करतो, अशी टीका पश्चिम बंगालमधल्या पुरुलिया, बिष्णूपूर आणि मेदिनीपूर मतदारसंघांमध्ये बोलताना प्रधानमंत्र्यांनी केली. सत्ताधारी तृणमूल काँग्रेस राज्यातल्या अनुसूचित जाती-जमाती आणि इतर मागासवर्गीयांचा विचार करत नाही, धर्माधारित आरक्षणासारख्या मुद्द्यांवर काँग्रेसला साथ देत आहे, असा आरोप त्यांनी केला.

देशातल्या व्यवसायांचा विकास होणं अतिशय महत्त्वाचं आहे, असं प्रतिपादन मोदी यांनी झारखंडच्या जमशेदपूर इथल्या प्रचारसभेत केलं. विरोधी पक्ष जर व्यावसायिक आणि गुंतवणूकदारांना विरोधच करत राहिले, तर रोजगारनिर्मिती होणार कशी, असा सवाल उपस्थित करून त्यांनी काँग्रेसवर टीकास्त्र सोडलं.

**<><><><><>**

उत्तर प्रदेशमध्ये लोकसभा निवडणुकीच्या सहाव्या आणि सातव्या टप्प्याचा प्रचार राज्यात शिगेला पोहोचला आहे.

भाजपचे ज्येष्ठ नेते आणि केंद्रीय मंत्री अमित शहा यांनी आज फुलपूर, प्रयागराज इथं निवडणूक रॅलीला संबोधित करताना, इंडिया आघाडीवर हल्लाबोल केला.काँग्रेसला देशाचे तुकडे करायचे आहेत, पण भाजप कधीही देशाचे तुकडे होऊ देणार नाही, असं ते म्हणाले.

भाजपचे ज्येष्ठ नेते आणि मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी आज आझमगड, प्रयागराजच्या फुलपूर आणि प्रतापगडमध्ये निवडणूक रॅलींना संबोधित केलं. आज आझमगडची ओळख बदलली आहे. रोजगाराच्या शोधात तरुणांचं स्थलांतर कमी झाल्याचं त्यांनी सांगितलं.

भाजप नेते आणि मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री मोहन यादव यांनी गाझीपूरमध्ये सभा घेऊन भाजप उमेदवाराच्या विजयाचं आवाहन केलं.

दुसरीकडे, काँग्रेसचे अध्यक्ष राहुल गांधी आणि सपा अध्यक्ष अखिलेश यादव यांनीही अलाहाबाद मतदारसंघातल्या संयुक्त जाहीर सभेला हजेरी लावली.

काँग्रेस नेते आणि मध्य प्रदेशचे माजी मुख्यमंत्री दिग्विजय सिंह यांनी महाराजगंज इथल्या पत्रकार परिषदेत भाजपवर जोरदार टीका केली. भाजप सरकारसाठी खोटे बोलत आहे,असं ते म्हणाले. बहुजन समाज पक्षाच्या प्रमुख मायावती यांची मढ इथं जाहीर सभा झाली. घोसी लोकसभा मतदारसंघातून पक्षाच्या उमेदवाराला विजयी करण्याचं आवाहन त्यांनी केलं. बसपा स्वबळावर निवडणूक लढवत असल्याचंही त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर भाजपा आम आदमी पार्टीला बदनाम करण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप आपचे ज्येष्ठ नेते सौरभ भारद्वाज आज नवी दिल्ली इथं बातमीदारांशी बोलताना केला. स्वाती मालिवाल मारहाण प्रकरणी भाजपा राजकीय कट-कारस्थान करत असल्याचं ते यावेळी म्हणाले.

दरम्यान आपनं केलेला हा आरोप खोटा असून या प्रकरणात भाजपानं कोणताही हस्तक्षेप केला नसल्याचं भाजपाचे दिल्ली विभागाचे अध्यक्ष वीरेंद्र सचदेव बातमीदारांशी बोलताना म्हणाले. स्वाती मालिवाल मारहाण प्रकरणी अरविंद केजरीवाल काहीच का बोलत नाहीत, असा प्रश्नही सचदेव यांनी यावेळी उपस्थित केला.

**<><><><><>**

ईशान्य, पूर्व आणि मध्य भारताच्या सपाट प्रदेशांमध्ये पुढचे पाच दिवस उष्णतेची लाट येण्याचा अंदाज असल्यानं हवामान विभागानं या भागांना रेड अलर्ट दिला आहे.

दरम्यान, नैऋत्य मान्सून आज मालदीव, कोमोरिन, बंगालच्या उपसागराचा दक्षिण भाग, निकोबार बेटं आणि दक्षिण अंदमान समुद्राच्या भागात थोडा पुढे सरकला. दक्षिण द्वीपकल्पीय परिसरात बुधवारपर्यंत अतिमुसळधार पावसाची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. पश्चिम बंगालमधला हिमालयाच्या पायथ्याचा प्रदेश, सिक्कीम, आसाम आणि मेघालयातही अशीच स्थिती राहील. बंगालच्या उपसागरात नैऋत्येला बुधवारच्या आसपास कमी दाबाचा प्रदेश तयार होण्याचा अंदाज आहे.

**<><><><><>**

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते, माजी मंत्री प्रतापराव भोसले यांचं साताऱ्यात भुईंज इथल्या निवासस्थानी आज पहाटे वृद्धापकाळानं निधन झालं. ते नव्वद वर्षांचे होते. प्रतापराव भोसले यांनी भुईंज गावचे सरपंच म्हणून राजकीय कारकिर्दीला सुरुवात केली. वाई खंडाळा विधानसभा मतदारसंघाचे ते चार वेळा आमदार होते. तसंच सातारा लोकसभा मतदार संघाचे ३ वेळा खासदार म्हणून त्यांनी प्रतिनिधित्व केलं.

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस, अजीत पवार यांनी प्रतापराव भोसले यांच्या निधनाबद्दल दुःख व्यक्त केलं आहे.

<><><><><>

थायलंड खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत भारताच्या सात्विक साईराज रांकीरेड्डी आणि चिराग शेट्टी यांनी पुरुष दुहेरीत विजेतेपद पटकावलं आहे. त्यांनी चीनच्या चेन बो यंग आणि लिऊ यी यांना २१-१५, २१-१५ असं पराभूत केलं. या भारतीय जोडीने काल चीनच्याच लु मिंग चे आणि तंग काई वेई यांचा उपांत्य फेरीत पराभव करत अंतिम फेरीत प्रवेश मिळवला होता.

<><><><><>

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज हैदराबादच्या राजीव गांधी स्टेडियमवर झालेल्या सामन्यात सनरायझर्स हैदराबादनं पंजाब किंग्जवर चार गडी राखून विजय मिळवला.

पंजाब किंग्ज संघानं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. त्यांचे सलामीचे फलंदाज अथर्व तायडे आणि प्रभसिमरन सिंग यांनी ९७ धावांची उपयुक्त भागिदारी केली. अथर्वनं ४६ तर प्रभसिमरननं ७१ धावा केल्या. रिली रोसौनं ४९, तर कर्णधार जितेश शर्मानं नाबाद ३२ धावांचं योगदान दिलं. निर्धारित २० षटकात पंजाबनं ५ गडी गमावून २१४ धावा केल्या.

सनरायजर्स हैदराबादनं सहा गड्यांच्या मोबदल्यात, सामन्यातले ५ चेंडू बाकी असताना ही धावसंख्या पार केली.

//<><><><><>//